SAMPLE CONTENT

मराठी (LL)

# व्याकरण व लेखन




सावली म्हात्रे
M.A., D.T.Ed.

अमृत पुलेकर
M.A., B.Ed.

## Std. VII
(ENG. MED.)

Target Publications® Pvt. Ltd.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ०४
यांच्याद्वारे नियोजित पाठ्यपुस्तकावर आधारित.

# मराठी (LL)

# व्याकरण व लेखन

## इयत्ता सातवी

### ठळक वैशिष्ट्ये

- पाठ्यपुस्तकातील व्याकरण व लेखनावर आधारित कृती समाविष्ट
- व्याकरण विभागातील सर्व घटकांच्या संकल्पनांचे सुलभ स्पष्टीकरण
- व्याकरण विभागात अंतर्भूत घटकांचा परिपूर्ण सराव
- उत्तरे लिहिण्याकरिता पर्याप्त जागा उपलब्ध
- उत्तरांचा पडताळा घेण्याकरिता उत्तरसूची समाविष्ट
- लेखन विभागातील सर्व घटकांच्या संकल्पनांचे सविस्तर स्पष्टीकरण अंतर्भूत
- लेखन विभागातील प्रत्येक घटकावर आधारित सोडवलेल्या भरपूर कृती
- लेखन विभागातील घटकांमध्ये आवश्यक तेथे सरावासाठी मुबलक कृती समाविष्ट

Sample Content

Printed at: **Print to Print,** Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2018MH0022

**TEID: 2329**

P.O. No. 4638

# अनुक्रमणिका

## प्रस्तावना

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील प्रत्येक टप्पा महत्त्वाचा असतो. इयत्ता सातवीचे वर्षही विद्यार्थ्यांच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जडणघडणीत भाषा महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळे, मराठी विषयात उत्तम गुण मिळवण्यासाठी, व्याकरण घटकांचा सखोल अभ्यास करण्याची सवय लागावी यासाठी, तसेच भाषेवर प्रभुत्व मिळवण्यासाठी **टार्गेट प्रकाशनाचे मराठी (LL) व्याकरण व लेखन इयत्ता सातवी** हे पुस्तक विद्यार्थ्यांच्या हाती सोपवताना आम्हांला आनंद होत आहे.

व्याकरणाच्या पायावर भाषेची इमारत उभी राहते. हा पाया मजबूत असेल, तर भाषेवर प्रभुत्व मिळवणे सोपे जाते, तसेच व्याकरणात अधिकाधिक गुण मिळवणे सहज शक्य होते. यासाठी व्याकरण घटकांच्या मूलभूत संकल्पना समजून घेणे आवश्यक असते. विद्यार्थ्यांची ही गरज ओळखून आम्ही या संकल्पनांचे सहज सोप्या भाषेत स्पष्टीकरण देण्याबरोबरच भरपूर सरावकृती समाविष्ट केल्या आहेत. शब्दसंपत्ती व व्याकरणावरील विद्यार्थ्यांची पकड मजबूत होईल याकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे.

लेखन विभागात नवनिर्मितीचा आनंद दडलेला असतो. विद्यार्थ्यांना स्वभाषेत लिखाणास प्रवृत्त करणे हा या अभ्यासामागील मूळ उद्देश आहे. लेखन विभागामध्ये समाविष्ट घटकांचे लेखन कसे करावे? कोणत्या गोष्टी लक्षात ठेवाव्यात? यासंदर्भातील सविस्तर विवेचन प्रत्येक घटकाच्या प्रारंभी देण्यात आले आहे. यासंदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळावे यासाठी अनेक नमुना कृतींनी यातील सारे घटक समृद्ध करण्यात आले आहेत. यामुळे, विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला व सृजनशीलतेला वाव मिळेल याची आम्हांला खात्री आहे.

व्याकरणावर आधारित भरपूर कृती, लेखन विभागातील १६ निबंध, ७ पत्रे, ४ जाहिराती, ५ बातम्या, ७ कथा, ५ संवादलेखन, ४ सूचनाफलक, ४ गद्य आकलन, ५ परिच्छेद लेखन, संदेश लेखन, घोषवाक्य, अनुलेखन एवढा विपुल अभ्यास झाल्यानंतर मुलांना जास्तीत जास्त गुण मिळवणे शक्य होईल.

सरावानेच सिद्धी प्राप्त होते असे म्हणतात. हा सराव योग्य दिशेने असावा याकरिता हे पुस्तक विद्यार्थ्यांना नक्कीच उपयुक्त ठरेल.

**धन्यवाद!**

**ज्ञानार्थींना मन:पूर्वक शुभेच्छा!**

**प्रकाशक**

**आवृत्ती:** प्रथम

हे पुस्तक परिपूर्ण करण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत, तरी पुस्तक अधिकाधिक उत्कृष्ट व्हावे, यासाठी आपल्या सूचना स्वागतार्ह आहेत. याकरिता आपला अभिप्राय mail@targetpublications.org या इ-मेल पत्त्यावर पाठवावा ही नम्र विनंती.

**Disclaimer**

This reference book is transformative work based on 'मराठी सुलभभारती; चौथे पुनर्मुद्रण: २०२१' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

| क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | **व्याकरण विभाग** | |
| १. | शब्दांच्या जाती | |
| • | नाम | १ |
| • | सर्वनाम | ३ |
| • | विशेषण | ४ |
| • | क्रियापद | ६ |
| • | क्रियाविशेषण अव्यय | ८ |
| • | शब्दयोगी अव्यय | १० |
| • | उभयान्वयी अव्यय | ११ |
| • | केवलप्रयोगी अव्यय | १३ |
| २. | काळ | १५ |
| ३. | उपसर्ग आणि प्रत्यय | १८ |
| ४. | समानार्थी शब्द | २१ |
| ५. | विरुद्धार्थी शब्द | २३ |
| ६. | लिंग | २६ |
| ७. | वचन | २९ |
| ८. | विरामचिन्हे | ३२ |
| ९. | लेखननियम | ३५ |
| १०. | वाक्प्रचार | ३७ |
| ११. | म्हणी | ४३ |
| १२. | शब्दसंपत्ती | ४६ |
| १३. | भाषिक खेळ | ५४ |
| • | सराव कृतिपत्रिका - १ | ६० |
| • | सराव कृतिपत्रिका - २ | ६२ |
| • | उत्तरे | ६४ |
| | **लेखन विभाग** | |
| १. | निबंधलेखन | ७५ |
| २. | पत्रलेखन | ८१ |
| ३. | जाहिरात | ८६ |
| ४. | बातमीपत्र | ८९ |
| ५. | कथालेखन | ९२ |
| ६. | संवादलेखन | ९८ |
| ७. | सूचनाफलक | १०० |
| ८. | गद्य आकलन | १०२ |
| ९. | परिच्छेद लेखन | १०४ |
| १०. | संदेशलेखन | १०५ |
| ११. | घोषवाक्ये | १०६ |
| १२. | अनुलेखन | १०७ |


**[टीप: पाठाखाली दिलेले व्याकरण, लेखनावर आधारित प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत.]**

Sample Content

Sample Content

# व्याकरण विभाग

## १ शब्दांच्या जाती

दैनंदिन जीवन जगताना संदेश एकमेकांपर्यंत पोहोचवण्याकरता आपण वाक्यांचा वापर करतो. ही वाक्ये विविध अर्थपूर्ण शब्दांपासून बनतात. त्यातील प्रत्येक शब्दाचा वाक्यात वेगळा उपयोग असतो. यावरूनच या शब्दांचे काही गटांमध्ये विभाजन केले जाते. त्यांनाच 'शब्दांच्या जाती' असे म्हणतात. मराठी भाषेमध्ये शब्दांच्या एकूण आठ जाती आहेत. शब्दांचा उपयोग वाक्यात करताना त्या शब्दांमध्ये बदल होत असतील, तर त्यांना विकारी (सव्यय) शब्द म्हणतात. ज्या शब्दांमध्ये वाक्यात उपयोग करताना बदल होत नाही त्या शब्दांना अविकारी (अव्यय) शब्द म्हणतात. शब्दांच्या एकूण जाती ८ आहेत. त्यातील विकारी (सव्यय) शब्द ४ प्रकारचे आहेत, तर अविकारी (अव्यय) शब्द ४ प्रकारचे आहेत.

**शब्दांच्या जाती**

| विकारी शब्द | अविकारी शब्द |
|---|---|
| १. नाम (Noun) | ५. क्रियाविशेषण अव्यय (Adverb) |
| २. सर्वनाम (Pronoun) | ६. शब्दयोगी अव्यय (Preposition) |
| ३. विशेषण (Adjective) | ७. उभयान्वयी अव्यय (Conjunction) |
| ४. क्रियापद (verb) | ८. केवलप्रयोगी अव्यय (Interjection) |

### नाम (Noun)

**प्रत्येक गोष्टीचे काही ना काही नाव असते. कोणतीही प्रत्यक्ष अथवा काल्पनिक व्यक्ती, वस्तू, प्राणी, जागा किंवा गुण यांना दिले जाणारे नाव म्हणजेच 'नाम' होय.**

**उदा.** रमेश, परी, देव, ताट, माकड, महाराष्ट्र, माया इत्यादी.

| सामान्यनाम (Common Noun) | विशेषनाम (Proper Noun) | भाववाचकनाम (Abstract Noun) |
|---|---|---|
| एकाच जातीच्या पदार्थांच्या समान गुणधर्मामुळे त्या वस्तूला दिलेले नाव म्हणजे 'सामान्यनाम' होय.<br>**उदा.** मंदिर, शब्द, पाखरू, पंख, समुद्र, नदी, पर्वत इत्यादी.<br>यात वस्तूचा, व्यक्तीचा, पदार्थाचा बोध होतो. | विशिष्ट व्यक्ती, प्राणी किंवा वस्तूचा बोध करून देणाऱ्या नामाला 'विशेषनाम' म्हणतात.<br>**उदा.** गणेश, मुंबई, वाघ, यमुना, सह्याद्री, सूर्य, पृथ्वी, ताजमहल इत्यादी.<br>यात वस्तूची किंवा व्यक्तीची ओळख होते. | व्यक्तीच्या, प्राण्यांच्या, वस्तूच्या प्रत्यक्ष किंवा काल्पनिक गुणधर्म किंवा भावभावनांना दिलेले नाव म्हणजे 'भाववाचकनाम' होय.<br>**उदा.** माधुर्य, मित्रत्व, श्रीमंती, समता, मालकी, दादागिरी, गारवा, चतुराई, महागाई इत्यादी.<br>यात व्यक्ती, वस्तू यांच्यातील गुणांचा बोध होतो. |

[**टीप:** मराठी भाषेत 'समुदायवाचक नामे' आणि 'द्रव्यवाचक नामे' यांची गणना सामान्य नामातच केली जाते. उदा. कळप, वर्ग, सैन्य, सोने, तांबे, दूध इत्यादी.]

Sample Content

**लक्षात ठेवा**

- सामान्य नामांचे अनेकवचन होते; मात्र विशेषनाम आणि भाववाचक नाम यांचे अनेकवचन होत नाही. ती सामान्यपणे एकवचनीच असतात.
- विशेषनाम व सामान्यनाम यांना प्रत्यय लावून भाववाचक नामे तयार होतात.
  उदा. शहाणा-पणा-शहाणपणा, गोड-वा-गोडवा.
- भाववाचक नामे तयार करताना जोडले जाणारे काही प्रत्यय - य, पणा, आई, वा, की, पण, गिरी इत्यादी.
- प्रत्यय नसलेली भाववाचक नामेही असतात.
  **उदा.** आनंद, दु:ख, राग इत्यादी.
- भाववाचक नामांमध्ये काही वेळा स्थिती किंवा क्रियाही दर्शवली जाते.
  **उदा.** चोरी, हास्य या क्रिया, तर तारुण्य, वार्धक्य या स्थिती दर्शवल्या जातात.

## सराव कृती

### कृ.१. खालील वाक्यांतील नामे ओळखून लिहा.

i. शाळा सुरू झाली. – ------------------------------
ii. आम्हांला कोट माहीतच नव्हता. – ------------------------------
iii. माझ्या धाकट्या भावाचा सदरा फाटला होता. – ------------------------------
iv. शिक्षक हतबल झाल्यासारखे बोलले. – ------------------------------

### कृ.२ खालील शब्दांपासून भाववाचक नामे तयार करा.

| | | |
|---|---|---|
| i. गरीब – ---------------- | ii. नम्र – ---------------- | iii. प्रामाणिक – ---------------- |
| iv. गार – ---------------- | v. मित्र – ---------------- | vi. चपळ – ---------------- |

### कृ.३. खालील वाक्यांत रिकाम्या जागी कंसात दिलेल्या शब्दाचे योग्य भाववाचकनाम लिहा.

i. राधेच्या बोलण्यात विलक्षण ------------------------ (गोड) होता.
ii. माणूस स्वत:मधील ------------------------ (मनुष्य) विसरून गेला.
iii. सीमाने काढलेल्या रांगोळीत ------------------------ (सुंदर) दडले होते.
iv. राघवमधील ------------------------ (धीर) वाखाणण्याजोगे होते.
v. विशालची ------------------------ (लबाड) साऱ्यांच्याच ध्यानात आली.

### कृ.४. खालील नामांचे वर्गीकरण करा.

पक्षी, सुगंध, भारत, नदी, निराशा, गेंडा, ममत्व, राधा, जंगल.

| सामान्यनाम | विशेषनाम | भाववाचकनाम |
|---|---|---|
| ------------------------ | ------------------------ | ------------------------ |

Sample Content

Page no. **3** to **59** are purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes** or **Target E-Notes**

Sample Content

# सराव कृतिपत्रिका – १
## व्याकरणावर आधारित

**वेळ: १ तास** **एकूण गुण – २०**

**कृ.१. खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांची जात ओळखा व तिचा प्रकार लिहा.** **(२ गुण)**

i. बागेचे <u>सौंदर्य</u> वाखाणण्याजोगे होते. – ------------------------------

ii. विराजने <u>दोन</u> पत्ते लपवले. – ------------------------------

**कृ.२. खालील वाक्यांत सूचनेनुसार बदल करा.** **(२ गुण)**

i. विशाल लग्नात नाचत होता. (वर्तमानकाळ करा.) – ------------------------------

ii. रमेशने नोकरी सोडली. (भविष्यकाळ करा.) – ------------------------------

**कृ.३. खालील उपसर्ग असलेले प्रत्येकी दोन शब्द तयार करा.** **(२ गुण)**

i. ना → ----------------, ----------------

ii. बे → ----------------, ----------------

**कृ.४. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** **(१ गुण)**

i. मित्र – ----------------------  ii. रस्ता – ----------------------

**कृ.५. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.** **(१ गुण)**

i. जबाबदार × ----------------------  ii. दीर्घ × ----------------------

**कृ.६. खालील शब्दांचे लिंग बदला.** **(१ गुण)**

i. नाग – ----------------------  ii. गवळी – ----------------------

**कृ.७. खालील शब्दांचे वचन बदला.** **(१ गुण)**

i. पेटी – ----------------------  ii. शाळा – ----------------------

**कृ.८. लेखननियमदृष्ट्या योग्य शब्द ओळखा.** **(१ गुण)**

परिक्षा / परीक्शा / परीक्षा / परिकशा – ----------------------

**कृ.९. खालील विरामचिन्हाचे नाव ओळखा.** **(१ गुण)**

i. [ , ] – ----------------------  ii. [ ! ] – ----------------------

**कृ.१०.खालील वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.** **(२ गुण)**

चेहरा उजळणे – ------------------------------

**वाक्य:** ------------------------------

**कृ.११.खालील शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा.** **(१ गुण)**

महिन्यातून एकदा प्रकाशित होणारे – ------------------------------

Sample Content

**कृ.१२.खालील शब्दात लपलेले शब्द लिहा.** **(१ गुण)**

रानमेवा – ------------------------------------------------------------

**कृ.१३.आलंकारिक शब्द लिहा.** **(१ गुण)**

संकुचित मनोवृत्ती असलेला – ----------------

**कृ.१४.एका शब्दाचे दोन भिन्न अर्थ लिहा.** **(१ गुण)**

---------------- ← माया → ----------------

**कृ.१५.खालील शब्दाचा वाक्यात उपयोग करा.** **(१ गुण)**

भान – ------------------------------------------------------------

**कृ.१६.खालील शब्दांसाठी प्रमाणभाषेतील शब्द लिहा.** **(१ गुण)**

i. टिव्ही – ----------------------- ii. कॉम्प्यूटर – -----------------------

Sample Content

Page no. **62** to **63** are purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes** or **Target E-Notes**

Sample Content

# उत्तरे

## १. शब्दांच्या जाती

- **नाम**

१. i. शाळा ii. कोट
iii. भावाचा, सदरा iv. शिक्षक

२. i. गरिबी ii. नम्रता/नम्रपणा
iii. प्रामाणिकपणा iv. गारवा
v. मित्रत्व vi. चपळाई

३. i. राधेच्या बोलण्यात विलक्षण **गोडवा** होता.
ii. माणूस स्वत:मधील **मनुष्यत्व** विसरून गेला.
iii. सीमाने काढलेल्या रांगोळीत **सौंदर्य** दडले होते.
iv. राघवमधील **धैर्य** वाखाणण्याजोगे होते.
v. विशालची **लबाडी** साऱ्यांच्याच ध्यानात आली.

४.

| सामान्यनाम | विशेषनाम | भाववाचकनाम |
|---|---|---|
| पक्षी, नदी, जंगल | भारत, गेंडा, राधा | सुगंध, निराशा, ममत्व |

- **सर्वनाम**

१. i. मला ii. मी
iii. कोणता iv. हा, त्याचा

२. काय, ती, जो, माझी, स्वत:, तुमचा, आम्ही, कोण.

३. i. मला ii. तो
iii. मी iv. त्याची

४.

| संबंधी सर्वनाम | अनिश्चित सर्वनाम | आत्मवाचक सर्वनाम |
|---|---|---|
| जो, जी, जे, ज्या | कोण, काय | स्वत:, आपण |

- **विशेषण**

१. i. तप्त ii. एक, रम्य, सुंदर
iii. एके, लहान, नवीन iv. बारा, हिरवेगार

२. नवीन, सुंदर, तीन, धाकटा, मोठा, अनेक, उंच, पिवळा.

३. i. एक ii. दोन्ही
iii. नवे iv. प्रसिद्ध
v. छान vi. काही

४. (i – ब) (ii – क) (iii – ड) (iv – अ)

५. i. **निळे** आकाश ii. **सुंदर** गुलाब
iii. **हुशार** मुलगी iv. **काळा** कावळा

६.

| क्र. | गुणविशेषण | संख्याविशेषण | सार्वनामिक विशेषण |
|---|---|---|---|
| i. | - | एक | - |
| ii. | धाकट्या | - | - |
| iii. | नवीन | - | - |
| iv. | हिरवेगार | दोन्ही, बारा | - |
| v. | - | - | ही |
| vi. | - | काही | - |

७. i. टवटवीत – फूल ii. बटबटीत – डोळे
iii. चमचमीत – जेवण iv. मिळमिळीत – भाजी
v. ठणठणीत – आरोग्य vi. गुळगुळीत – दगड

८. i. सुंदर ii. हळवे
iii. मनकोवळा iv. मोकळी

९.

| गुणविशेषण | संख्याविशेषण | सार्वनामिक विशेषण |
|---|---|---|
| हुशार, लबाड, जाडा, कटू | दुसरी, तिप्पट, अर्धा, काही, पाऊण | तसला, तिच्या, जेवढा, असल्या, माझ्या |

- **क्रियापद**

१. i. गेलो ii. सापडला
iii. फिरवला iv. ओरडला
v. खोकायची

२. सुचली, घेतला, होईल, नव्हती, सांगितली, जाईन, बसलो.

३. i. चौदा वर्षांचा गोपाळ **ओरडला**.
ii. गाडीतील सारेजण **हसले**.
iii. तप्त जमिनीला मेघ शांतवू **लागले**.
iv. दोन वार कापड **घेतले**.
v. ध्येयावर डोळे **होते**.
vi. मी चुलीजवळ शेकत **बसलो**.

४. i. कालच मी सहलीला जाऊन **आलो**.
ii. आम्ही तुझ्या पत्राची वाट बघत **आहोत**.
iii. हळूच मी खुर्चीवर **बसलो**.
iv. हळूहळू पुष्कळ लोक निघून **गेले**.
v. त्यांनी मला **तपासले**.

Sample Content

५. i. तुझा निरोप मी आईला **सांगेन**.
ii. महेशने साऱ्या कथा **वाचल्या**.
iii. अजय साऱ्यांना खाऊ **देईल**.
iv. तू आता घरी **जा**.

६. i. त्यांनी – हे सर्वनाम आहे, इतर नामे आहेत.
ii. सातपुते – हे नाम आहे, इतर सर्वनामे आहेत.
iii. हिमालय – हे नाम आहे, इतर सर्व विशेषणे आहेत.
iv. आम्ही – हे सर्वनाम आहे. इतर सर्व क्रियापदे आहेत.

७.

| क्र. | नाम | सर्वनाम | विशेषण | क्रियापद |
|---|---|---|---|---|
| i. | कर्णागड | - | - | आहे |
| ii. | ड्रायव्हरने, गाडीचा | - | - | वाढवला. |
| iii. | पाईप, गोपाळने | - | तो, लांब | आणला. |
| iv. | चेहरे | - | - | होते. |

## क्रियाविशेषण अव्यय

१. i. आता ii. वर
iii. चमचम iv. गुण्यागोविंदाने

२.

| कालवाचक | स्थलवाचक | रीतिवाचक | परिमाणवाचक /संख्यावाचक |
|---|---|---|---|
| दररोज, क्षणोक्षणी, परवा, सतत | तिथे, पलीकडे, समोरून, वर | टपटप, सावकाश, झटकन, कसे | अतिशय, पूर्ण, जरा, मुळीच, थोडा |

३. i. माझे हसणे क्षणोक्षणी वाढतच गेले.
ii. मंदा लिहिताना नेहमी चुका करते.
iii. आईने आशाला शंभरदा बजावले.
iv. सभोवार दाट झाडी होती.

४. i. **पूर्वी** वाहतुकीची साधने कमी होती.
ii. मी **घटघटा** पाणी प्यायलो.
iii. मला आई **समोरून** येताना दिसली.
iv. **सगळीकडे** हिरवेगार गवत उगवले होते.

५. i. थोडासा ii. मोजके iii. काही
iv. हळू v. आज vi. आजकाल
vii. जरासा viii. सावकाश ix. खाली
x. तिकडे xi. अनेकदा xii. वर
xiii. कदाचित xiv. थोडा xv. जरा
xvi. रोज xvii. अनेक xviii. काल
xix. थोडे xx. सावकाश xxi. जिकडे

६. i. अचानक – रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यय
ii. सैरावैरा – स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यय
iii. गमतीने – रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यय
iv. आज – कालवाचक क्रियाविशेषण अव्यय

## शब्दयोगी अव्यय

१. i. वर ii. कडे
iii. जवळून iv. जवळ

२. i. आमच्या शाळेसमोर वडाचे झाड आहे.
ii. मुलांनी फुगेवाल्याभोवती गर्दी केली.
iii. आमचा कुत्रा मला नेहमी मित्राप्रमाणे भासतो.
iv. देशाला देण्यासाठी तुमच्याकडे दहा मिनिटे वेळ आहे का?
v. टेबलावर फुलदाणी आहे.

३. i. साठी ii. सह iii. खाली
iv. सकट v. वर vi. समोर
vii. नंतर viii. मागे ix. प्रमाणे
x. पुढे xi. सारखा xii. नजीक

४. आमच्या घरासमोर बाग आहे. बागेमध्ये तऱ्हेतऱ्हेचे वृक्ष, फुलझाडे आहेत. बागेपुढे रस्ता आहे. रस्त्यावर सतत वर्दळ सुरू असते. झाडांवर पक्ष्यांची घरटी आहेत. बागेच्या प्रवेशद्वाराला कधीही कुलूप लावले जात नाही. झाडामागे मुले लपंडाव खेळतात. बागेजवळच शाळा आहे. रस्त्यावरून जाणारी वाहने आणि बागेत असणारी मुले यांचा आवाज दिवसभर येत असतो.

५. वाचनाकडे, सुट्टीमध्ये, बाईदेखील, पानावर, विवाहानंतर, मोत्यासारखी, दुसऱ्यापेक्षा.

## उभयान्वयी अव्यय

१. i. व ii. परंतु iii. तेव्हा
iv. की v. आणि

२. आई : आपल्याकडे पाहुणे येणार आहेत, म्हणून पुरणपोळी करूया.
अकुंश : आई, तू बटाट्याची भाजी अन् पुऱ्या कर म्हणजे मी तुला मदत करू शकेन, शिवाय स्वयंपाकही लवकर होईल. जर पाहुणे लवकर आले, तर त्यांना वेळेवर जेवायला मिळेल; पण पाहुण्यांना आवडेल ना आपण केलेला स्वयंपाक?

३. i. आणि ii. परंतु iii. म्हणून
iv. किंवा v. तरी vi. वा

Sample Content

Page no. **66** to **74** are purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes** or **Target E-Notes**

Sample Content

# लेखन विभाग

## १ निबंधलेखन

निबंधलेखन करताना दिलेला विषय समजून घेणे आवश्यक असते. एखादा प्रसंग, व्यक्ती किंवा ठिकाण यांबद्दलचा निबंध लिहिताना आपल्याला त्याविषयीचे ज्ञान असणे आवश्यक असते. 'असे झाले तर...' अशी कल्पना करून लिहिताना घडू शकणाऱ्या सर्व गोष्टींचा विचार आपल्याला करावा लागतो. वैचारिक निबंध लिहिताना दिलेल्या विषयाची चांगली बाजू व वाईट बाजू यांचा विचार करून व त्यावरून आपले मत मांडत आपण मुद्देसूदपणे लेखन केले, तर आपला निबंध अधिक परिणामकारक होतो. सोपे शब्द, छोट्या वाक्यांचा उपयोग, सुविचार, म्हणी यांचा वापर आणि परिच्छेदांमध्ये केलेले लेखन यांमुळे आपला निबंध आकर्षक ठरतो. निबंधलेखन करताना सुवाच्य अक्षरात, खाडाखोड न करता टापटीपपणे लेखन करण्याचा प्रयत्न करा.

### नमुना कृती

**कृ.१. खालील विषयांवर निबंध लिहा.**

१. **माझा दादा**

उत्तर:

**माझा दादा**

आमचे एक छोटेसे कुटुंब आहे. आई, बाबा, दादा आणि मी असे माझे हे चौकोनी कुटुंब. माझे आजी-आजोबा गावाला असतात. आई-बाबा दोघेही नोकरीनिमित्त घराबाहेर पडतात, त्यामुळे मी अधिक वेळ माझ्या दादाच्या सहवासात असतो. तो महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. पुढे कॉम्प्यूटर इंजिनिअर बनण्याची त्याची तयारी सुरू आहे. अगदी लहानपणापासूनच तो माझी खूप काळजी घेतो. यामुळे, आई-बाबाही निश्चिंतपणे काम करतात. तो स्वत: अभ्यासू असल्यामुळे माझा अभ्यास तो व्यवस्थित करून घेतो. मला चित्रकलेत किंवा प्रकल्प बनवण्यात त्याची मोठी मदत मिळते. घरात आम्ही दोघेच असताना मला जे हवे नको ते तोच पाहतो. आम्ही दोघे मिळून अनेकदा वेगवेगळे खेळ खेळतो. संगणकातील, मोबाइलमधील नवनवीन गोष्टी मला दादामुळे सहज शिकता येतात. आपण कसे वागावे, कसे वागू नये हे सारे काही तो स्वत:च्या कृतीतून मला शिकवतो.

मोठा भाऊ, मार्गदर्शक आणि मित्र असेच आमचे नाते आहे. काहीवेळा छोट्या छोट्या गोष्टींत आम्ही भांडतोसुद्धा! पण सारे विसरून मला प्रेमाने जवळ घेणारा, माझे लाड करणारा माझा दादा म्हणजे माझे सर्व काही आहे. माझं त्याच्यावर खूप खूप खूप प्रेम आहे.

२. **माझा मित्र**

उत्तर:

**माझा मित्र**

माझ्या वर्गात अनेक मुले-मुली आहेत. त्यांच्याशी माझी चांगली मैत्री आहे. आमच्या सोसायटीमध्येही अनेकजणांशी माझी मैत्री आहे; पण माझा सगळ्यांत आवडता मित्र आहे यश. यश आणि माझी मैत्री अगदी लहानपणापासूनची आहे. तो आमच्याच सोसायटीमध्ये राहतो. त्याचे आईबाबा आणि माझे आईबाबासुद्धा चांगले मित्रमैत्रिणी आहेत.

यशची आणि माझी मैत्री कशी झाली ते आठवत नाही; मात्र आम्ही अगदी लहानपणापासून एकत्र शाळेत जातो, एकत्र डबा खातो. खेळतानाही आम्ही एकत्रच असतो. आम्हांला एकमेकांशिवाय अजिबात करमत नाही. खूपवेळा आम्ही एकत्र गृहपाठ करतो. आम्ही एकत्र खोड्यादेखील करतो. शाळेतील कोणत्याही कार्यक्रमात आमचा एकत्र सहभाग असतो. एखाद्या दिवशी तो शाळेत आला नाही, तर मला चुकल्यासारखे वाटते. काहीवेळा शाळेतील इतर विद्यार्थी व शिक्षकांना आम्ही भाऊ आहोत, की काय असे वाटते.

यश नेहमी सर्वांना मदत करण्यासाठी तयार असतो. मलाही अभ्यासात काही अडचण असेल, तर तो स्वत: समजावून सांगतो. तो स्वभावाने मनमिळाऊ आहे. तो सर्वांना आवडतो. त्यामुळे, त्याची सर्वांशीच पटकन मैत्री होते. तो मनाने फार हळवा आहे. त्याला इतरांचे दु:ख सहन होत नाही. तो अशा गरजूंना मदत करण्याचा नेहमी प्रयत्न करतो. माझ्या या मित्राचा मला अभिमान वाटतो. आमची मैत्री अशीच टिकून राहावी अशीच प्रार्थना मी ईश्वरचरणी करतो.

Sample Content

३. **माझी शाळा**

उत्तर:

**माझी शाळा**

'आवडते मज मनापासुनी शाळा...' होय माझी शाळा मला खूप आवडते. माझ्या शाळेचे नाव ज्ञानयोग विद्यामंदिर आहे. आमच्या शाळेची इमारत खूप मोठी आहे. आमची शाळा इंग्रजी माध्यमाची असून इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतचे विद्यार्थी येथे शिक्षण घेतात. आमच्या परिसरातील ही एक नामवंत शाळा आहे. लहानसे ग्रंथालय, एक प्रयोगशाळा, प्रोजेक्टर रूम, संगणक कक्ष अशा अनेक सुविधांनी माझी शाळा सज्ज आहे. शाळेच्या समोर मोठे मैदान आहे. या मैदानात आम्ही विविध खेळ खेळतो. शारीरिक शिक्षणाच्या तासाला कवायत, लेझीम या प्रकारचे प्रशिक्षण आम्हांला दिले जाते. आमच्या शाळेतील शिक्षक-शिक्षिका अतिशय प्रेमळ आहेत. आमच्या मुख्याध्यापिका मनमिळाऊ; पण कडक शिस्तीच्या आहेत. आमच्या सफाईवाल्या काकांमुळे शाळेचा परिसर नेहमीच स्वच्छ असतो. शाळेतील शिपाई व मावशी विद्यार्थ्यांची अतिशय मनापासून काळजी घेतात. येथील प्रत्येक शिक्षक जीव ओतून आम्हांला शिक्षण देतो. त्यामुळे, आमच्या शाळेत अनेक गुणवंत विद्यार्थी घडतात. शिक्षक व आमचे नाते अतिशय जिव्हाळ्याचे आहे.

माझ्या शाळेतील अनेक माजी विद्यार्थी विविध कार्यक्षेत्रांत मोठमोठ्या पदांवर कार्यरत आहेत. क्रीडा, सांस्कृतिक, तसेच शैक्षणिक क्षेत्रात शाळेचे नाव खूप मोठे आहे.

मीही माझ्या शाळेचे नाव मोठे करावे अशी माझी खूप इच्छा आहे. त्यासाठी मी प्रयत्नशील आहे. मी ज्ञानयोग विद्यामंदिरचा विद्यार्थी आहे याचा मला सार्थ अभिमान आहे.

४. **माझे गाव**

उत्तर:

**माझे गाव**

प्रत्येकाला आपले गाव प्रिय असते. मलाही माझे गाव खूप आवडते. मे महिन्याच्या सुट्टीत आम्ही गावाला जातो. माझे गाव कोकणात आहे. गावाच्या एका बाजूला समुद्रकिनारा आणि दुसऱ्या बाजूला डोंगर आहे. गावात एक पुरातन शंकराचे मंदिर आहे. हाच आम्हां मुलांच्या खेळण्याचा अड्डा आहे. या ठिकाणी अनेक भाविक दर्शनाला येतात.

आंबा, काजू, फणस या फळांची झाडे गावात आहेत; त्यामुळे मे महिन्याची सुट्टी खूप मजेत जाते. समुद्रावर खेळायला जाणे, वाळूत किल्ले बनवणे, तसेच पाण्यात पोहायला जाणे अशी मौजमजा आम्ही गावी करतो. माझ्या गावी असलेले आजीआजोबा माझे खूप लाड करतात. आजी वेगवेगळे पदार्थ बनवून खायला देते. आजोबा आम्हांला गावात, गावाबाहेरील माळरानात फिरायला घेऊन जातात. गावच्या संस्कृतीचा परिचय करून देतात. दिवसभर खेळणे, मौजमस्ती असा आमचा कार्यक्रम सुरू असतो. गावाच्या बाजूला असलेल्या जंगलात करवंदांच्या जाळीतून आम्ही करवंदं, जांभळं गोळा करणं हा आमचा फावल्या वेळेचा कार्यक्रम. गावची हवा नेहमीच ताजीतवानी असते. त्यामुळे, मनही ताजेतवाने होऊन जाते. दिवसभर उन्हातान्हातून भटकून आल्यावर घरामागच्या विहिरीच्या थंडगार पाण्याने हातपाय धुतल्यावर अगदी प्रसन्न वाटते.

कधीकधी कायम गावी राहणाऱ्या माझ्या मित्रांबद्दल मला हेवा वाटतो. माझे गाव मला इतके प्रिय आहे, की कधी एकदा मला गावी जाण्याची संधी मिळते याची मी वाट पाहत असतो. असं माझं लहानसं गाव माझ्यासाठी जगातील सर्वांत सुंदर ठिकाण आहे.

५. **वृक्ष आपले मित्र**

उत्तर:

**वृक्ष आपले मित्र**

माणसाचे वेगवेगळे मित्र आहेत, त्यातील सर्वांत जवळचा मित्र म्हणजे वृक्ष होय. वृक्ष हा निसर्गातील एक महत्त्वाचा घटक आहे. झाडे आपल्याला प्रत्येकवेळी वेगवेगळ्या प्रकारे मदत करत असतात. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे माणसाला आवश्यक ऑक्सिजन झाडे पुरवतात, तर हानिकारक कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात. झाडाच्या फांद्या, खोड, मुळे, पाने, फुले सारे काही माणसाला उपयोगी पडते. फांद्या व खोडापासून घराचे सामान, वस्तू बनतात. पाने, फुले, फळे, मुळे यांपासून औषधे, खाद्यपदार्थ, सुगंधी द्रव्ये बनवली जातात. झाडाची सावली उन्हातल्या, थकलेल्या प्राण्यांना, पक्ष्यांना, मनुष्याला सावली देते. झाडापासून शोभिवंत, तसेच उपयोगी वस्तू बनवल्या जातात. सुकलेल्या झाडाचा वापर सरपण म्हणून केला जातो. कागद निर्मितीसाठी झाडांचा उपयोग होतो. असे एक ना अनेक फायदे मानवाला या वृक्षांपासून होत असतात.

Sample Content

## AVAILABLE BOOKS FOR STD. VII:
(ENG., MAR. & SEMI ENG. MED.)

### NOTES
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History-Civics
- Geography
- General Science
- Mathematics

### NOTES
- My English Book
- मराठी बालभारती
- हिंदी सुलभभारती
- इतिहास व नागरिकशास्त्र
- भूगोल
- सामान्य विज्ञान
- गणित

### WORKBOOK
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History-Civics
- Geography
- General Science
- Mathematics

### ADDITIONAL TITLES
GRAMMAR & WRITING SKILLS BOOKS
(STD. VII & VIII)
- Marathi
- Hindi


## AVAILABLE BOOKS FOR STD. VIII:
(ENG., MAR. & SEMI ENG. MED.)

### NOTES
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History and Civics
- Geography
- General Science
- Mathematics

### NOTES
- My English Book
- मराठी बालभारती
- हिंदी सुलभभारती
- इतिहास व नागरिकशास्त्र
- भूगोल
- सामान्य विज्ञान
- गणित

### WORKBOOK
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- My English Book
- मराठी बालभारती

### OUR PRODUCT RANGE
Children Books | School Section | Junior College
Degree College | Entrance Exams | Stationery




Explore our range of STATIONERY

Visit Our Website

Target Publications® Pvt. Ltd.

**Address:**
2nd floor, Aroto Industrial Premises CHS,
Above Surya Eye Hospital, 63-A, P. K. Road,
Mulund (W), Mumbai 400 080
**Tel:** 88799 39712 / 13 / 14 / 15
**Website:** www.targetpublications.org
**Email:** mail@targetpublications.org